**आजचा शुभ विचार**

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा." आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-59 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 04 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५९ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. ०५ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## छत्रपती संभाजीनगरमध्ये भरधाव कारने भर रस्त्यावर अनेक जणांना चिरडले; अपघातात २ ठार, ४ जखमी

दिपक रोकडे
छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------



शुक्रवार दिनांक ४ जुलै २०२५ रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर शहरात एक भीषण अपघात घडला. सिडको एन-१ परिसरातील काळा गणपती मंदिरासमोर एका भरधाव कारने पाच जणांना चिरडले. या हृदयद्रावक घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाला असून, चार जण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी कारचालक प्रशांत मगर याला ताब्यात घेतले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या अपघाताबाबत सविस्तर मिळालेल्या माहितीनुसार, कारचालक प्रशांत एकनाथ मगर (वय ३०, रा. सिडको) हा गारखेडा येथील क्रीडा संकुलातून टेनिस खेळून आपल्या स्विफ्ट डिझायर कारने (MH-20-HH-0746) घरी परतत होता. काळा गणपती मंदिरासमोरील वळणावर त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले. त्याने निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात गाडी चालवत रस्त्यावरील वाहनांना आणि पादचाऱ्यांना धडक दिली.

या अपघातात काळा गणपती मंदिराचे ७० वर्षीय सुरक्षारक्षक गुणाजी लक्ष्मणराव शेवाळे यांचा जागीच मृत्यू झाला. तसेच, अन्य एका वाटसरूचाही मृत्यू झाला असल्याची माहिती आहे, परंतु त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही.

याव्यतिरिक्त, मनीषा विकास समधाने (वय ४०), विकास समधाने (वय ५०), रवींद्र भगवंतराव चौबे (वय ६५) आणि श्रीकांत प्रभाकर राडेकर (वय ६०) हे चार जण गंभीर जखमी झाले आहेत. समधाने दाम्पत्याला जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, चौबे आणि राडेकर यांना मिनी घाटी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कारचालक सिडको एन १ भागातील पिरॅमिड चौकाकडून काळा गणपती मंदिर रस्त्याने भरधाव वेगात येत होता. त्याने गणपती मंदिरच्या बाजूला असलेल्या साकोळकर हॉस्पिटलसमोरील वाहनांना धडक दिली. त्यानंतर मंदिरात फुलविक्री करणाऱ्या महिलेच्या पतीला चिरडले, जो नुकताच मंदिराकडून परत निघाला होता. यानंतर त्याने मंदिरात दर्शनासाठी आलेल्या आणि रस्त्याने जाणाऱ्या चार जणांना चिरडून कार थेट मंदिराच्या पायऱ्यांवर जाऊन धडकली. कारने एक नो पार्किंगचा खांबही उडवला होता. या घटनेनंतर परिसरात एकच आक्रोश आणि गोंधळ उडाला. रस्त्यावर रक्ताचा सडा पडला होता. स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात हलवले. पोलिसांनी चालक प्रशांत मगर याला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी दिली.


**महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !**

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

**प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना**

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449


## 'जय गुजरात...'; पुण्यातील कार्यक्रमात एकनाथ शिंदेंची शहांसमोर घोषणा

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'जय महाराष्ट्र' नंतर 'जय गुजरात' अशी घोषणा दिल्याने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. पुण्यातील जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्घाटन समारंभात दि.४ रोजी हा प्रसंग घडला.

मराठी आणि हिंदीवरून वाद सुरु असतानाच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पुण्यात जय गुजरातची घोषणा करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री अमित शाह आज पुण्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी जयराज स्पोर्ट्स् आणि कन्व्हेंशन सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भाषण केले. यावेळी भाषण संपतानाच शिंदे यांनी धन्यवाद, जय महाराष्ट्र असे म्हंटले आणि तेथून जाणार तेवढ्यात खाली वाचून त्यांनी पुढे जय गुजरात असा नारा दिला. यावरून आता वाद सुरु होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. गुजराती समाजाकडून पुण्यातील कोंढवा भागात हे सेंटर उभारण्यात आले आहे. शिंदे यांनी अमित शाह यांच्या उपस्थितीत हा नारा दिला आहे.

## शिवसेना (उबाठा) नेते चंद्रकांत खैरेंनी टायमिंग साधलं

### 'काहीही म्हणा, देवेंद्रजींना वाटतंय की, दोन्ही भाऊ एकत्र येऊ नये'

**दिपक रोकडे**
**संभाजीनगर प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**



राज्यातील भाजप महायुती सरकारला ठाकरे बंधूंनी दिलेल्या दणक्यानंतर हिंदी सक्तीचा अध्यादेश रद्द करावा लागला. उद्या मुंबईत ठाकरे बंधूंचा विजय मेळावा आहे. त्याची जोरात तयारी सुरू आहे.

या विजय मेळाव्यानिमित्ताने दोन्ही ठाकरे बंधूंच्या कार्यकर्त्यांमध्ये शंभर हत्तीचं बळ संचारलं आहे. छत्रपती संभाजीनगरमधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना पक्षाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी टायमिंग साधत, भाजप सीएम देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. चंद्रकांत खैरे यांनी साधलेलं टायमिंग मात्र चर्चेत आलं आहे.

चंद्रकांत खैरे यांनी एका वाक्यात भाजप सीएम देवेंद्र फडणवीस यांच्यावर ठाकरे बंधू यांच्या एकत्र येण्यावरून निशाणा साधला. 'भाजप किंवा देवेंद्र फडणवीस यांना वाटत होते की, दोघे भाऊ एकत्र येऊ नये. ठाकरे ब्रँड आता राहणार आहे, आणि ते दिसतो. राज ठाकरे बाहेर पडले, तेव्हा आम्हाला दुःख झाले. पण आता आनंद होत आहे की, ते दोघे एकत्र येत आहेत. राज ठाकरे सोडून गेले, तरी बाळासाहेब ठाकरे यांचे त्यांच्यावर प्रेम होते', असेही चंद्रकांत खैरे यांनी म्हटले. मी 'मातोश्री'चा सैनिक आहे. सर्वांना आनंद झाला आहे की, दोन्ही भाऊ एकत्र यावे, ही मराठी माणसाची इच्छा आहे. आज महाराष्ट्रामध्ये भ्रष्टाचार अन् भांडणे सुरू आहेत, दोन्ही भाऊ एकत्र आले, तर आनंद होईल. मी शिवसेनेत आमदार, खासदार आणि मंत्री झालो, या दोघांसोबत काम केल्याचे चंद्रकांत खैरे यांनी म्हटले. हिंदीला विरोध नाही, पण हिंदी लादू नये. पण दोन्ही भावांचा याला विरोध होता. सरकारने खोटा आदेश काढला, तो रद्द झाला म्हणून हा विजय मेळावा होत आहे. हा विजय मेळावा राज्याच्या राजकारणात ऐतिहासिक ठरेल, असे देखील चंद्रकांत खैरे यांनी म्हटले आहे.

चंद्रकांत खैरे यांनी शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांच्यावर टीका करताना हा कचरा माणूस आहे, असे म्हटले. तर भाजप मंत्री नितेश राणे यांच्यावर देखील खैरे यांनी टीका केली. मुंबईमध्ये उद्या जबरदस्त वातावरण राहणार आहे. मनसे, शिवसेना आणि इतर मराठी जनता येणार आहे. मी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना धन्यवाद देतो त्यांनी चांगली भूमिका घेतली. मग नाऱ्या बिऱ्या ज्या टीका करतात ते करू द्या, शेवटी काही जरी झाले तरी दोन्ही भाऊ एकत्र येत आहेत, असा टोला चंद्रकांत खैरे यांनी लगावला.

देवेंद्र फडणवीस यांनी चहा प्या, समोसा घ्या, तुम्ही पनीर खा, तुम्ही व्यायाम करा, तुम्ही सेव्हिंग करा, असे बोलतात. पण आतून त्यांना वाटते हे दोघे भाऊ एकत्र येऊ नये, आणि हे सर्व दुनियेला माहित आहे. फडवणीस वरतून बोलतात, असा टोला खैरेंनी लगावला. पण काही टिन पाट लोक बोलतात, असे होऊ शकत नाही, त्यांना वाटते हे दोघे एकत्र आले, तर आपले काय होईल, आणि या भीतीने ते लोक बोलतात', असेही देखील चंद्रकांत खैरे यांनी म्हटले.

## लाडक्या बहिणींना कर्ज देण्याचा कोणताही विचार नाही

### मंत्री आदिती तटकरेंचा खुलासा..! अजित पवारांच्या घोषणेचे काय झाले?

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



दोन महिन्यांपूर्वीच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी कर्जाबाबत घोषणा केली होती. त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दुजोराही दिला होता. पण दोन महिन्यांत महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री आदिती तटकरेंनी अशी कोणतीही योजना सध्या सरकारच्या अजेंड्यावर नसल्याचे स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान आदिती तटकरेंनी दिलेल्या लेखी उत्तरात हे सांगितले आहे. त्यामुळे अजित पवारांनी केलेल्या घोषणेचे काय झाले? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या वर्षी मे महिन्यात उपमुख्यमंत्री व राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मुखेडमध्ये एका कार्यक्रमात बोलताना लाभार्थी महिलांना कर्ज पुरवठा करण्याबाबत अजित पवारांनी घोषणा केली होती. ही कर्ज पुरवण्यासाठी सरकार सहकारी बँका व इतर स्थानिक बँकांसोबत भागीदारी करण्याचा विचार सरकार करत असल्याचे अजित पवार म्हणाले होते. जिल्हा सहकारी बँका माझ्या बहिणींना ३० ते ४० हजारांचे कर्ज देऊ शकतात. हे रक्कम त्यांना छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठीचं भांडवल म्हणून कामी येईल. नंतर या महिलांच्या खात्यात या कर्जाचे हप्ते चुकते करण्यासाठी १५०० रुपये प्रतिमहिना जमा केले जातील असे अजित पवार म्हणाले होते. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही लाभार्थी महिलांना मिळणा-या या आर्थिक मदतीतून त्यांना अधिकाधिक फायदा होईल यासाठी राज्य सरकार काम करत आहे. ही योजना कार्यक्षमपणे राबवली जाईल असे म्हटले होते.

अजित पवारांनी जाहीर केलेल्या या योजनेसंदर्भात विधानसभेत विचारणा केली असता आदिती तटकरे यांनी त्यावर नकारात्मक उत्तर दिले. अशी कोणतीही योजना सध्या सरकारच्या अजेंड्यावर नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आदिती तटकरेंनी विधानसभेत लाडकी बहीण योजनेबाबत निवेदन सादर करताना यासंदर्भातली आकडेवारी दिली. लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांना १५०० रुपयांचा लाभ मिळावा यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्य गटातील लाभार्थ्यांसाठी २८ हजार २९० कोटी, अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून ३२४० कोटी आणि सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जातींमधील लाभार्थ्यांसाठी ३९६० कोटींची तरतूद केली आहे. त्यानुसार निधी वितरीत करण्यात आला आहे असे तटकरेंनी आपल्या उत्तरात सांगितले. २२८९ सरकारी कर्मचारी महिलाही लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये होत्या ही बाब आदिती तटकरेंनी विधानसभेत मान्य केली आहे. या महिलांना योजनेसाठी अपात्र ठरवण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

संपादकीय

# राज्य सरकारचे अपयश

सध्या समाजमाध्यमावर म्हसे गावातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी रोज जीव धोक्यात घालून पिंजाळ नावाची वाहती नदी ओलांडताना टायर ट्यूबवरून प्रवास करावा लागत असल्याचे व्हीडीओ व्हायरल होत आहेत. वेगाने वाहणा-या नदीच्या प्रवाहातून जीव मुठीत धरून शाळेत जाण्यासाठी या केविलवाण्या लहान मुलांची चाललेली धडपड काळीज पिळवटणारी आहे. ऐन पावसाळ्यात पावसाच्या धारा अंगावर झेलताना या धडपडीत कपडे भिजणे, पुस्तके भिजणे हे रोजचेच झाले आहे. या विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी चांगला रस्ता मिळावा, नदीवर पूल व्हावा अशी गावक-यांची अनेक वर्षांची रास्त मागणी शासन दरबारी धूळ खात पडली आहे. या अनुषंगाने जपान सरकारची एक कृती भारतीयांच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे. अवघ्या एका मुलीला शाळेत जाता यावे म्हणून या मुलीच्या शाळेच्या वेळेनुसारच रेल्वेचे वेळापत्रक ठरवून रेल्वेगाडी चालवणा-या जपान सरकारची कृती कौतुकास्पदच म्हणावी लागेल. काही वर्षांपूर्वी जपान सरकारने या एकमेव मुलीचे शिक्षण बंद पडू नये म्हणून तिच्या गावापर्यंत जाणारी रेल्वे चालू ठेवली आणि तिचे शिक्षण पूर्ण होताच ती रेल्वे लाईन बंद केली म्हणे! केवळ म्हसे गावातच नव्हे तर भारताच्या दुर्गम भागातील, आदिवासी पाड्यातील हजारो, लाखो मुलांना शाळेत जाताना अपु-या सुविधांमुळे अशीच जीवघेणी कसरत करावी लागते.

जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनलेली भारतीय अर्थव्यवस्था या लहानग्या मुलांची शाळेत जाण्यासाठी होणारी फरफट थांबवेल काय? धुळे जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील केलरवाडी पाड्यातील विद्यार्थ्यांना पावसाळ्यात शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी जीव धोक्यात घालून डोंगर-द-यातून वाटेत लागणारी नदी आडव्या झालेल्या झाडावरून पार करावी लागते हे चित्र खूपच वेदनादायक, विदारक आहे. तेथील ग्रामस्थांनाही पावसाळ्यात असाच धोकादायक प्रवास करावा लागतो. डोंगर-द-यात वसलेल्या या गावातील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेची शाळा गाठण्यासाठी रोज पाच ते सहा किलोमीटर असा जोखीमयुक्त आणि भीतीदायक करावा लागणारा प्रवास हे प्रशासनाचे अपयशच म्हटले पाहिजे. पालकांमध्ये आणि मुलांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण करणे ही महत्त्वाची बाब असताना गत अनेक वर्षांपासून ग्रामस्थ पूल बांधून मिळावा म्हणून प्रशासनाकडे विनवणी करत आहेत आणि त्याकडे प्रशासन व लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत आहेत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. पहिलीपासून तिस-या भाषेच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न करणारे 'मी पुन्हा येईन' फेम सरकार जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने कधी लक्ष देणार हा प्रश्नच आहे.

म्हसे गावच्या पुलाच्या मागणीकडे प्रशासनाने १५ वर्षांपासून दुर्लक्ष केले आहे. शहापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना अपु-या बससेवेविरुद्ध रस्त्यावर उतरून ठिय्या आंदोलन करावे लागले. मुरबाड तालुक्यातील घसई ओजीवले या कातकरी वाडीत जाण्यासाठी रस्ता नसल्याने गर्भवती महिलेला प्रसूतीसाठी बांबूच्या झोळीतून नेण्याची वेळ आली. पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील एका गरोदर महिलेचा आणि तिच्या बाळाचा वेळीच रुग्णवाहिका न मिळाल्याने मृत्यू झाला. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. पायाभूत सुविधांसाठी हा निधी पुरवला जातो. परंतु हा निधी नक्की जातो कुठे? नागरिकांपर्यंत सुविधा पोहोचत नसल्याने लोकांचे हाल होताना दिसतात. मग प्रश्न पडतो हा निधी जातो कोठे? निवडणुकांसाठी वापरला जातो का? नागरी पायाभूत विकास निधी योजनेअंतर्गत महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती यांना दीड हजार कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध केले जाणार आहे.

नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण भागात नागरी पायाभूत सुविधा केव्हा पोहोचणार असा प्रश्न पडतो तेव्हा आपसूकच प्रश्न पडतो निधी जातो कोठे? शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकरी आक्रमक बनला असताना महामार्ग तयार करण्याचा घाट कशासाठी घातला जात आहे? शक्तिपीठ महामार्गासाठी राज्य सरकार व्याजाने रक्कम उभी करणार आहे. सध्या प्रचंड कर्जाच्या बोजाखाली राज्य सरकार दबले आहे. त्यात अजून भर कशासाठी घातली जात आहे? ठिकठिकाणी विरोध होत असताना ८६ हजार कोटींचा शक्तिपीठ महामार्ग रेटला जातोय, ६१ हजार कोटींचा समृद्धी महामार्ग अजूनही विस्तारतोय, पण नंदुरबारमधील ४०० लोकवस्तीच्या केलखाडी गावात पुलाअभावी नदी पार करण्यासाठी डोंगरपाड्यातील लहान विद्यार्थ्यांना चिमुकला जीव मुठीत धरून २४ फूट लांब झाडाच्या आडव्या खोडावरून दोरीच्या सहाय्याने पाठीवरील दप्तरासहित तोल सावरत २० फूट खोल नदी पार करून शाळा गाठावी लागते ही वस्तुस्थिती पाहताना काळजाचा थरकाप उडतो. अनेक वर्षे पुलाची मागणी करूनसुद्धा सरकारला जाग येत नाही,

या उदासीनतेला काय म्हणावे? अशीच परिस्थिती राज्यातील अनेक ठिकाणी आहे. शासन जर तळागाळातील गरीब जनतेच्या जीवाचे मोल जाणतच नसेल आणि गरिबांच्या रस्त्यापेक्षा महामार्गच सरकारला गरजेचे वाटत असतील तर ही सत्ताच एके दिवशी भुईसपाट होऊ शकते! राज्याचे अर्थमंत्री विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हजारो कोटींच्या पुरवणी मागण्या मांडत असतील, प्रत्येक अधिवेशनाला पुरवणी मागण्या मांडल्या जात असतील तर अर्थसंकल्पाची गरजच काय? वास्तविक अर्थसंकल्पात संपूर्ण वर्षाचे नियोजन असते, तशी तरतूद केली जाते. त्यावेळी कुठे, किती पैसा लागणार आहे हे अर्थमंत्र्यांच्या लक्षात येत नाही का? येत नसेल तर ते अर्थमंत्र्यांचे पर्यायाने सरकारचे अपयश म्हणावे लागेल. अर्थसंकल्प हा आता कागदोपत्री फक्त उपचारच राहिला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधीचा वर्षाव केला आहे.

प्रासंगिक

# क्षण एक आनंदाचा परम भाग्याचा



निमित्त होते जीवन गौरव पुरस्कार सोहळ्याचे. दिवसभराच्या बिझी शेड्युल मधून, वेळात वेळ काढून, नाशिक येथे रंगलेल्या मनुमानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व महावीर इंटरनॅशनल संस्था नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जीवन गौरव पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख अतिथी मा. डॉ. शेफालीताई भुजबळ डायरेक्टर चिफअॅडमिस्ट्रेटर भुजबळ कॉलेज नाशिक यांच्या हस्ते व जेष्टश्रेष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत मला जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. व्यासपिठावर जेंव्हा त्यांनी मला सन्मानपत्र ट्रॉफी दिली, न कळत माझ्या तोंडून जय ज्योती ! जय क्रांतीचा ! उदघोष केला त्यांनी त्याच क्षणी मला गुलाबपुष्प देऊन आनंद व्यक्त केला. आयुष्यात मला पैसा नाही कमवता आला परंतु चांद्यापासून बांद्यापर्यंत, नाशिक ते नागपूर, गल्ली ते मुंबई, नव्हे नव्हे उभ्या महाराष्ट्रात साहित्यक्षेत्रात समाजबांधवांच्या आशिर्वादाने बहुतांशी कवी लेखक संपादक मला नावानिशी ओळखतात. अजुन मला काय हवे ? काही लोक म्हणतात तुमच्याकडे काय आहे. ? होय माझ्याकडे नाहीच काही. परंतु सोन्या सारखी माणंस आहेत हिच माझी गर्भ श्रीमंती. वास्तवात माझ्या कुटूंबाला साहित्याचा वारसा नसतांना देखील, आज घडीला केवळ आणि केवळ वै.अॅड. बापूसो. संभाजीराव पगारे, यांनी ह्या गंजलेल्या लोखंडाला त्यांचा परिसरूपी स्पर्श केल्यानेच ! समाजात व साहित्यात माझे सोने झाल्याचे, वैचारिक हितवादी मतांचे जुने जानते दिग्गज जेव्हा व्यक्त होतात, तेंव्हा मी भरून पावतो.

---

लेखक
गावगाडाकार साहेबराव नंदन
तात्या ताहाराबादकर नाशिक

# नाशिककरांसाठी अमूल्य ठेवा

## गोदावरीच्या महापुराचा इशारा देणारी नारोशंकराची घंटा झाली ३०४ वर्षांची







शहरातील अत्यंत पुरातन समजल्या जाणाऱ्या नारोशंकर मंदिरावर असलेल्या घंटेच्या निमिर्तीला ३०४ वर्षे पूर्ण झाली असून, ही घंटा १७२१ सालात तयार करण्यात आली आहे. यंदा २०२५ मध्ये तिला ३०१ वर्षे पूर्ण झाले आहेत.

घंटेवर १७२१ साल कोरलेले असून, ही घंटा पोर्तुगीज कारागिरांनी तयार केलेली आहे. यावर युरोपियन व अरेबियन लिपीत काही अक्षरे लिहिली आहेत. थोरले बाजीराव पेशवे यांचे बंधू चिमाजीअप्पा पेशवे यांनी पोर्तुगीजांविरुद्ध झालेल्या लढाईत १७३८ मध्ये वसईमधून विजयानंतर ही घंटा आणली. ही घंटा मराठ्यांच्या विजयाचे व पराक्रमाचे प्रतीक मानले जाते. तेव्हा एकूण तीन घंटा आणण्यात आल्या होत्या. पैकी एक नाशिकच्या नारोशंकर मंदिरात, दुसरी भीमाशंकर मंदिरात तर तिसरी घंटा पिलाजीराव जाधव यांनी सासवडच्या भैरवनाथ मंदिरात दिली आहे. या घंटा काशाच्या धातूपासून बनविल्या आहेत. कासे हा धातू कथिल, तांबे व जस्त यांच्या मिश्रणाने तयार केला जातो हा धातू कधीही न गंजणारा असतो.

नारोशंकराच्या मंदिरावर असलेली घंटा आजही सुस्थितीत असून, पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. नारोशंकराच्या मंदिरात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, लॉर्ड माउंट बॅटन, श्री श्री रविशंकर अशा अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या असून, १७४७ साली सरदार नारोशंकर राजेबहाद्दर यांनी १८ लाख रुपये खर्च करून नारोशंकराचे मंदिर बांधले. घंटा वसईच्या विजयानंतर १७४० साली आणली, परंतु, ती घंटा वसईचे सुभेदार फडके यांच्याकडे ठेवली होती. कार्यबाहुल्यामुळे नारोशंकर यांनी १७५७ मध्ये नाशिकला स्थायिक झाल्यावर ही घंटा हत्तीवर आणून मंदिरात बसवली. नदीला पूर आल्यानंतर या घंटेचा आवाज तीन किलोमिटर लांब आवाज जात असे. नारोशंकराच्या मंदिराला पूर्वी 'रामेश्वर मंदिर' म्हणून ओळखले जात होते. हे मंदिर बांधण्यासाठी राजस्थान व गुजरात येथून कुशल कारागीर आणण्यात आले. मंदिर ३७.७९ मीटर बाय २५.२९ मीटर आवारात बांधले गेले असून, त्याच्या चारही बाजूंनी ५.५ मीटर उंचीचा संरक्षक कोट बांधला आहे. गोदावरीच्या पुरातून संरक्षण होण्यासाठी हा कोट बांधला आहे. चारही कोपऱ्यात बुरुज आहेत. मंदिर उत्तर हिंदुस्थानी नागरशैलीत बांधलेले आहे मंदिर अत्यंत भव्य व सुंदर असून, स्थापत्य कलेचा उत्तम नमुना आहे. मंदिराचे मुख्य शिखर २६ मीटर उंचीचे असून, त्यावर पौराणिक प्रसंग, हत्ती, सिंह प्राण्यांची शिल्पे कोरली आहेत.

दगड मारल्याने घंटेला तडा

या घंटेला अज्ञात व्यक्तीने काही वर्षांपूर्वी दगड मारला. त्यामुळे या घंटेला तडा गेला. यावेळी राजेबहाद्दर कुटुंबीयांनी मूर्तिकारांची मदत घेऊन घंटेची दुरुस्ती केली. त्याचबरोबर यातील लोलक हा सुमारे १० किलोचा आहे. येणारे पर्यटक कुतुहलाने तो हलवत होते, त्यामुळे परिसरात आवाज येत असल्याने हा लोलक काढून ठेवण्यात आला आहे.

महापुराचा इशारा

या घंटेला पुराचे पाणी लागल्यानंतर लोलक पाण्याच्या लाटेमुळे हालत होता. त्यातून जो आवाज निर्माण व्हायचा त्यातून शहराला पाण्याची पातळी समजायची. या घंटेचा आवाज हा तीन किलोमिटरपर्यंत पोहचत असे. दरम्यान, नाशिक महापालिकेचे बोधचिन्ह म्हणूनदेखील या घंटेचा वापर करण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या बोधचिन्हावर घंटेचे चित्र वापरले गेले आहे. महापालिकेच्या प्रत्येक कागदावर या घंटेचे चित्र पहायला मिळते.

नारोशंकर मंदिराच्या घंटेचा परिघ सहा फूट व्यास १०० सेंटिमीटर आणि उंची १०७ सेंटिमीटर आहे

घंटेवरची कडी ७ सेंटिमीटर असून, वजन २० मण आहे

याचा लोलक १० किलोचा असून, त्याला तीन कड्या आहेत.

वाचकांच्या लेखणीतून

# संघर्ष....!



कर्तृत्वाच मोजमाप यशाच्या उंचीवरून नव्हे, तर संघर्षाच्या खोलीवरून होत...! चार ढग आडवे आले म्हणून सूर्याच अस्तित्व कधीच संपत नसते .. लहानपणापासुन अतिशय खडतर परिस्थितीशी झुंज देत ध्येयासाठी धडपडत तो रोज जगायचा. लहानपणापासून त्याच्या वाट्याला आलेला संघर्ष करताना कुणाच्यातरी पाठिंब्याची गरज वाटायची तेव्हा जणू परिस्थिती त्याला सांगायची वेड्या, थकून जाऊ नकोस तुला गरज नाही पाठिंब्याची संकटांना तू एकटाच बास आहेस, वाट्याला तुझ्या रोजचा संघर्ष आहे कारण तुझ्यातच काहीतरी खास आहे...! या व्यक्तिमत्त्वाला घडविणारे तेवढेच विशेष म्हणजे त्याचे आईवडील.. लक्षात ठेव लोक उगवत्या सूर्याला नमस्कार घालतात मावळत्या नाही ही त्यांची शिकवण आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी हाडाच पाणी करून लोखंड उचलणारा, साध्या राहणीमानाचा आणि कष्टाळू बाप आणि ९ वारी ,कपाळावर मोठ कुंकू गळ्यात साधी काळी पोत ,सुखी संसाराची स्वप्न सजवत मोलमजुरी करणारी ,आई..सोबतच करावा लागणारा रोजचा संघर्ष एवढच भांडवल होत त्या मुलांच.. लहानपणी गुर राखायची, शेतीची काम करायची आणि सोबतच स्वप्न पूर्ण करण्यासाठी अतोनात मेहनत घ्यायची ... हळू हळू आता शाळेतले दिवस संपत आले पुढच्या शिक्षणाची सोय नव्हती परंतु शिकण्याची प्रचंड जिद्द, म्हणून मामाकड राहून प्रचंड मेहनत करून त्याने आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. पुढे आईच्या इच्छेखातर science ला प्रवेश घेऊन पाउले शहराकडे वळाली सायन्स शिकल्याने माणूस खूप हुशार आणि मोठा होतो आशी त्या भोळ्या भाबड्या आईचा समज .मग चालू झाली स्वप्नांसाठी ची ती धडपड प्रचंड मेहनत, जिद्द, इच्छाशक्ति आणि रोज करावा लागणारा संघर्ष...

दिवसभर कॉलेज आणि रात्री हॉटेल मध्ये काम करून मेहनतीने तो मुलगा शिकत होता. हळूहळू आपली स्वप्न सत्यात आणू पाहत होता... क्षमतेपेक्षा जास्त धावू पहायचा तेव्हा दमून जायचा पण पुन्हा एकदा परिस्थिती त्याला जणू शिकवून जायची की क्षमतेपेक्षा जास्त धावताना जरी दम लागत असला तरी लक्षात ठेव क्षमतेपेक्षा जास्त धावायला ही दमच लागतो आणि मग प्रयत्नांची मारायचा तो उंच भरारी... दिवसामागून दिवस जात होते एक दिवस त्याच्या स्वप्नांची पहाट उजाडली आणि सातासमुद्रापार त्याला बोलावण आल, दिवस रात्र केलेली मेहनत कामी आली, हाडाच पाणी करून शिकवणार्या आई बापाच्या कष्टाला फळ मिळाल आणि त्यांच्या सायकलवर शाळा शिकणार्या लेकरान विमानाने आकाशात उंच भरारी मारली..! आणि आपल स्वप्न सत्यात उतरवल .... आज सातासमुद्रापार एक यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपास असणारे हे व्यक्तिमत्त्व सूर्यासारखा तेजस्वी, ओजस्वी, प्रखर, आणि प्रेमळ असणार व्यक्तिमत्व म्हणजे म्हणजे माझा मामा...(दत्ता मांदळे) परिस्थितीशी झुंज देत स्वप्न पूर्ण करणाऱ्या लाखो तरुणांच प्रेरणास्थान ... आणि आम्हा सर्वांचा आदर्श ...! धोतरातल्या बापाच्या आणि ९वारीतल्या आईच्या मातृत्वाला आणि त्यांच्या विश्वासाला ,स्वप्नांना जागणार व्यक्तिमत्त्व...

आजही झुंज देण्या संकटांशी
तो उंबरठ्यावर खडा
युगे युगे लढतोय
जसा सह्याद्रीचा कडा...!

सर्वांच्या आनंदामध्ये त्याने स्वत:चा आनंद शोधला शब्दांमधे सांगता न येणारा संघर्ष त्याने एकट्याने लढला... आयुष्यात मोठ होण्यासाठी चार गोष्टी महत्त्वाच्या असतात शिस्त, निर्धार, निर्णय आणि समर्पण...!

---



निलमताई इचके
(युवाव्याख्याता,
निवेदिका,लेखिका)
संपर्क ७३७८८५९०१०

# शेतकरी मित्र बिंदू शेठ शर्मा यांची खाजगी कसमादे शेतकरी कृषी मार्केट येथे सल्लागार पदी नियुक्ती

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---



खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार ढोलबारे येथिल शेतकरी कार्यसमितीची आज दि. ०३/०७/२०२५ वार गुरुवार रोजी बैठक पार पडली यामध्ये सर्वानूमते मतदान प्रक्रियद्वारे सुभाष शिंदे यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी मयुर नेरकर, नितिन अहिरराव, सौ. संगिता नेरकर यांची निवड, तर सल्लागार पदी शेतकरी नेते बिंदू शेठ शर्मा यांची निवड करण्यात आली.! त्याबद्दल बागलाण, साक्री, धुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन केले तसेच स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण अहिरे कसमादे खाजगी मार्केट कमिटीचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पवार, श्री गणेश पवार, श्री अमोल बच्छाव, सदस्य, कर्मचारी सर्वांनी श्री बिंदू शेठ शर्मा यांचे अभिनंदन केले.

# विरोधी पक्षनेत्याला दर्जा द्यायलाच हवा पण... महाराष्ट्राचे राजकारण कधी 'दर्जदार' होणार?

१ जुलै २०२५ च्या दैनिक 'लोकसत्ता'मध्ये आमदार जयंतराव पाटील यांनी एका चांगल्या मुद्याची चर्चा करणारा लेख लिहिला आहे. सभागृहात विषय मांडल्यानंतर, अध्यक्ष निर्णय देत नाहीत, म्हणून कदाचित ते वृत्तपत्रांकडे गेले असावेत... वास्तविक विधान मंडळाचे वृत्तसंकलन करणाऱ्या वृत्तपत्रांनी या विषयांवर महाराष्ट्राच्या ६५ वर्षांचा सगळा तपशील प्रभावीपणे व्यक्त करायला हवा होता. लोकशाहीमध्ये 'सत्ताधारी आणि विरोधी' आमदार हे सभागृहात सम-समान आहेत. त्यात भेद करता येत नाही. लोकशाहीत सत्ताधाऱ्यांएवढाच विरोधी पक्ष आवश्यकही आहे आणि तो विरोधी पक्ष कमी-जास्त प्रमाणात असला तरी, त्याचा धाक सत्ताधाऱ्यांना असतो... हे महाराष्ट्र विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षाने हजारवेळा सिद्ध करून दाखवले आहे. १९६७ साली सत्ताधारी बाकावर काँग्रेसचे २०२ आमदार होते. १९७२ साली २०२ चे २२२ झाले. समोरचा विरोधी पक्ष संख्येने दुबळा होता...पण गुणवत्तेमध्ये एवढा तगडा होता की, २२२ आमदारांना घ[illegible]ाम फुटायचा... सरकारची दमछाक व्हायची... १९६२ ते १९७२ सलग १० वर्षे विधानसभेचे अध्यक्ष बाळासाहेब भारदे होते. त्याच काळात अधिकृतपणे मान्यता नसलेला पण, सलग १० वर्षे ज्यांचा विरोधी पक्षनेता म्हणून दरारा होता... असे कृष्णराव धुळप यांना सभागृह वचकून होते. मुख्यमंत्रीही त्यांचा आदर करीत होते. उद्धवराव पाटील भाषणाला उभे राहताना महराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे सभागृहातून बाहेर जायला उठले असतील नंतर त्यांच्या लक्षात आले की, 'उद्धवराव बोलायला उभे राहिले आहेत' तर, 'स्वारी' म्हणून पुन्हा आपल्या जागेवर बसत आणि लक्षपूर्वक भाषण ऐकत... विरोधी पक्षनेत्याचा आदर करण्याची त्यावेळच्या सरकारच्या वागण्यातील सुसंकृतपणा क्षणाक्षणाला जाणवायचा... याच विरोधी पक्षाने रोजगार हमी योजनेसाठी पैसे उभे करायचे असतील तर 'कर' लावा, हा प्रस्ताव विरोधी बाकावरून आला होता... जगाच्या लोकशाहीत असे कधी घडलेले नाही. १९५२ पासून त्यावेळचा सगळ्या विरोधी पक्षांचे काम पहा... संख्या गौण होती... गुणात्मक दर्जा हजारपटीने होता... मंत्र्यांना अभ्यास करून यावे लागत होते. एकदा असे झाले की, शंकरराव चव्हाण यांनी संतप्त झालेल्या एन. डी. पाटील यांना जोरदारपणे सांगितले की, 'तुम्ही एवढ्या जोरात बोलता... पण, आमच्या मागे बहुमत आहे...' एन. डी. पाटील ताडकन म्हणाले, 'माननीय मुख्यमंत्री बी. एल. एल. बी. आहेत... मी एम. एल. एल. बी. आहे... 'राज्यशास्त्र हा माझा एम. ए. चा विषय होता.' 'बहुमत असलेला पक्षच सत्ताधारी असतो'... हे समजण्याएवढा मी राज्यशास्त्राचा अभ्यास केलेला आहे... पण, आम्ही जेव्हा सामान्य माणसाचे प्रश्न घेवून रस्त्यावर लढाई लढतो तेव्हा बहुमत आमच्यासोबत असते... तुमच्यासोबत नसते... आमच्या मागे.... आमच्या चळवळीत आणि मोर्चात आलेले लोक, आमच्या पक्षाला मतदान करतीलच असे नाही, म्हणून तर आम्ही अल्पमतात आहोत... पण त्यांचे प्रश्न घेवून आम्ही लढतो तेव्हा ते आमच्यासोबत असतात आणि आम्ही बहुमतात असतो... आणि विरोधी पक्षाचे हेच तर काम आहे...' त्यावेळच्या विरोधी पक्षाची ही ताकद होती. त्यावेळच्या प्रत्येक सभापतींनी विरोधी पक्षाची सदस्य संख्या [illegible]किती ही मोजली नाही... अतिशय सन्मानाने विरोधी पक्षनेत्याला दर्जा दिलेला आहे. अर्थात विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा अधिकृत दर्जा, शासकीय बंगला, मंत्र्याएवढ्याच सगळ्या सोयी... स्टाफ हे विधेयक महाराष्ट्र विधानसभेनेच प्रथम १९७८ साली मंजूर केले. वसंतदादा पाटील तेव्हा मुख्यमंत्री होते. दादा हे असे व्यक्तिमत्त्व होते की, १९५२ ला ते पहिल्यांदा तासगाव मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. आणि १९७२ ला मंत्री झाले... तेसुद्धा इं[illegible]दिरा गांधी यांच्या आग्रहाने... २० वर्षे आमदार असताना, मंत्री व्हावे, असे त्यांना वाटलेच नव्हते... आता कोणी आमदार २० दिवस थांबायला तयार असतो का?

१९६७ ला प्रदेश काँग्रेसचे ते अध्यक्ष होते. तेव्हा २०२ आमदार निवडून आले. जेव्हा ९ राज्यांत काँग्रेसची सरकारे पराभूत झाली होती. १९७२ साली ही संख्या २२२ झाली. पण, विरोधी पक्षनेते दि. बा. पाटील यांना दर्जा दिला गेला... विरोधी पक्षात आमदार किती, हा निकष महाराष्ट्र विधानसभेच्या नियमात नाही. असल्यास अध्यक्षांनी तो नियम वाचून दाखवावा... सभागृहाच्या १० टक्के विरोधी पक्षाचे सदस्य असले पाहिजेत. हा नियम लोकसभेकरिता आहे. महाराष्ट्र विधानसभेत हा नियम झालेला नाही. असे नाही... कोरमकरिता मात्र हा नियम आहे... पण, ३० वर्षे विधानसभा वृत्तसंकलन केलेल्या माझा अनुभव असा आहे की, कोरम नसतानाही सभागृहात अनेकवेळा चर्चा चालू राहिलेल्या आहेत.

'विधानमंडळाने लोकभावनांची बूज राखावी,' या शिर्षकाखाली आमदार जयंत पाटील यांनी मुद्देसूद लेख लिहिला आहे पण त्यांना याची कल्पना असेल ही बूज राखायची असेल तर अध्यक्ष एका मिनिटांत [illegible]निर्णय करू शकतात.. पण, अलिकडचे निर्णय केवळ पीठासीन अधिकाऱ्यांचे असतात, असे समजू नका... राज्याच्या मुख्यमंत्र्यांची भूमिका काय? हे विचारल्याशिवाय हा निर्णय होणार नाही... त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी विरोधी पक्षनेत्याला मान्यता दिली काय आणि नाही दिली काय... आजच्या विरोधी पक्षाला विधानसभेत दर्जा आहे की नाही, यापेक्षा लोकांचे प्रश्न घेवून रस्त्यावर उतरण्याची भूमिका पहिल्याप्रथम घ्यावी. आज महाराष्ट्रातील सामान्य माणसांचे प्रश्न अधिक बिकट झाले असताना, त्या प्रश्नाला वाचा फोडणारा नेता नेमका कोण आणि रस्त्यावर उतरणारा नेमका कोण आहे, या प्रश्नाचे उत्तर लोकांना हवे आहे. विधानसभेत दर्जा मिळाला काय आणि न मिळाला काय... आजचे एकूणच राजकारण 'दर्जा' या शब्दाच्या अर्थाच्या पलिकडे गेलेले आहे. त्यामुळे समाजातील धटिंगणपणा का वाढला? याचे उत्तर 'जसे राज्यकर्ते...तशी जनता...' असे तर नसेल ना? म्हणून जयंतरावांची भूमिका 'लोकभावनेचा आदर' करावा, अशी असली तरी, आताच्या राजकारणाचा लोकभावनेशी किती संबंध शिल्लक राहिलेला आहे. याची आधी चर्चा करा.... तसा संबंध असता तर केंद्राकडून पंजाबच्या शेतकऱ्यांविरोधातील कायदे केलेच गेले नसते... आणि महाराष्ट्रात हिंदीच्या सक्तीचा प्राथिमक शिक्षणापासून ढोल बडवला गेला नसता... एक नाही तर १० विषयांत सरकारला माघार घ्यावी लागली नसती. विरोधी पक्षनेत्याला दर्जा आहे की नाही, यापेक्षासुद्धा या महाराष्ट्रातील सामान्य माणसाला दर्जा आहे का? त्याच्या प्रश्नाबद्दल कोणी बोलत आहे का? त्यावेळच्या सभागृहातील विरोधी पक्षाएवढे आक्रमक आमदार आज सभागृहात आहेत का? दि. बा. आहेत का? गणपतराव आहेत का? केशवराव धोंडगे आहेत का? बापू काळदाते आहेत का? नवनीत बारशीकर आहेत का? नवनीत शहा आहेत का? सुदाम देशमुख आहेत का? मृणालताई आहेत का? म्हाळगी आहेत का? पी. डी. रहांदळे अ[illegible]ाहेत का? डांगे-एस. एम.- दत्ता देशमुख, उद्धवराव, ए. बी. बर्धन यांची गोष्ट तर दूरच राहिली.... जांबुवंतरावांसारखाही तगडा नेता आज सभागृहात नाही... जो चार चिठ्या पाठवून एक लाख लोकांचा मा[illegible]ेर्चा आणत होता... आचार्य अत्रे यांच्या शिर्षकाने महाराष्ट्राला 'मुंबई राज्य'या नावापासून वाचवण्यात आले आणि आपले नाव 'महाराष्ट्र' झाले. विधानसभेत ते गरजले होते, 'आमचे नाव महाराष्ट्रच...' आज असे गरजणारे किती आहेत? ज्या आमदारांचा सरकारला धाक वाटेल, असे चारित्र्याचे आमदार किती आहेत? ज्यांच्या मागे रस्त्यावर लाखभर लोक उभे राहतील, असे आमदार किती आहेत? विधानसभेत लोकभावनेची बूज अनेक विषयांत राखली जात नाही... आणि म्हणूनच आजचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत आणि 'जे प्रश्न नाहीत' ते 'नसलेले प्रश्न' मोठे केले गेले... जग कुठे चाललेय... आणि आम्ही आ[illegible]ैरंगजेबाची कबर खोदायची की नाही, यावर दोन महिने दिवसभर चर्चा करून चॅनलवाले धुमाकूळ घालत होते. लोकांचे प्रश्न काय आहेत? आणि आमचे काय चालले आहे... महागाईचे प्रश्न किती आहेत? कापसाला-सोयाबीनला भाव का नाही? उन्हाळ्यात टँकरने पाणीपुरवठा का करावा लागतो? भगिनींच्या डोक्यावर अजून हंडा का आहे? गरिब माणसाला ग्रामीण भागात आरोग्य सेवा आहे का? त्याचे नेमके कोण आहे... हे प्रश्न विचारणाराही कोणी नाही.... त्यासाठी मोर्चा काढणाराही का[illegible]ेणी नाही.... आणि त्याची उत्तरे देणाराही कोणी नाही... अशा स्थितीत सापडलेल्या महाराष्ट्रात विरोधी पक्षनेत्याला 'दर्जा' द्यायला हवा, ही मागणी अतिशय न्याय आहे... पण, समजा उद्या 'दर्जा' दिला तर महाराष्ट्राच्या लोकांचे प्रश्न घेवून तो नेता रस्त्यावर उतरण्याची हमी आहे का? राजकारणातील सगळेच विषय बिघडल्यासाखे आहेत... लोकांचे प्रश्न वेगळे आहेत.. सध्याचे राजकारण वेगळे आहे... तेव्हा समंजस्यपणाने हे प्रश्न सोडवायचे असतील तर संयमाने विचारपूर्वक काम करणारे सरकार हवे आणि तेवढ्याच दर्जाचा विरोधी पक्षनेता हवा... आज ती स्थिती डोळ्यांसमोर नाही... महाराष्ट्र विधानसभेतील विरोधी पक्षांनी पुरोगामी कायद्यांसाठी चांगल्या कायद्यांना त्याहून चांगल्या दुरूस्त्या सूचवून पहाटे पाच-पाच वाजेपर्यंत विधानसभेचे अधिवेशन चालवलेले आहे. प्रत्येक सूचना मताला टाकून मतदान घेतलेले आहे. मंत्र्यांनी त्याची समर्पक उत्तरे दिलेली आहेत. चांगल्या सूचना स्वीकारलेल्या आहेत. त्यातून महराष्ट्राचे १० कायदे देशाने आदर्श कायदे म्हणून स्वीकारलेले आहेत. ती विधानसभा पाहण्याचे भाग्य लाभलेले माझ्यासारखे जे आहेत, त्यांना आजचा गोंधळ पाहिल्यानंतर महाराष्ट्रात नेमके काय सुरू आहे, याचा अंदाजच येत नाही... बजेट झाल्यानंतर पावसाळी अधिवेशनात ५७ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या महाराष्ट्राच्या ६५ वर्षांत पहिल्यांदाच मांडल्या गेल्या असतील....

महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या डोक्यावर आज ६५ हजार रुपये कर्ज आहे... प्रश्नाचे स्वरूप वेगळे आहे.... ग्रामीण भाग उद्धवस्त होत आहे... खेड्यात रखरखाट आहे... आणि शहरांत लखलखाट आहे... हाच संघर्ष आहे... शहरांत चालायला रस्ता नाही. वाहतूक कोंडीने माणसे बेजार आहेत. शहरे फुगत चालली अ[illegible]ाहेत... नियोजन कोसळत चालले आहे... त्याचा स्फोट ज्या दिवशी होईल त्या दिवशी महाराष्ट्राला कोण सावरणार आहे? तो नेता सत्ताधारी बाकावर दिसत नाही.... विरोधी बाकावरही दिसत नाही... त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेत विरोधी पक्षनेत्याला दर्जा देताना... (तो द्यायलाच हवा...) कायदेतज्ज्ञ राहुल नार्वेकर अध्यक्ष आहेत... त्यांनी त्यांचे अधिकार वापरून हा निर्णय करावा... पण विरोधी पक्षनेत्याच्या दर्जाबरोबरच महाराष्ट्राच्या एकूण राजकारणाचा पा[illegible]ेत आणि दर्जा हा दर्जेदार होईल, यासाठी तो [illegible]निर्माण करणाऱ्या नेत्याचे नाव काय? आणि तो नेता कोण आहे?

सगळ्यात अडचण अशी आहे की, महाराष्ट्रातील प्रत्येक विषयात 'दर्जा' या शब्दाचा अर्थच घसरत चाललेला आहे. घसरण सगळ्याच विषयात आहे... आणि ती घसरण थांबवणारा नेता आज दिसत नाही. हीच मुख्य अडचण आहे... सभागृहात दर्जे भेटतील... पण, ४० वर्षांपूर्वीचा महाराष्ट्राचा दर्जा पुन्हा कधी मिळेल..?

महाराष्ट्र विधानसभेत १९५७ साली विरोधीपक्ष नेतेपदी फक्त एक वर्षाकरिता एस. एम. जोशी हे होते. त्या आगोदर आर. डी. भंडारे हा[illegible]ेते... मग एस. एम. जोशी झाले... मग उद्धवराव पाटील झाले... एस. एम. जा[illegible]ेशी यांचे विरोधीपक्ष नेतेपदाची मुदत संपल्यानंतर ते यशवंतरावांच्या घरी गेले... आणि त्यांनी यशवंतरावांना सहकार्य केल्याबद्दल हार घालत होते... यशवंतरावांनी तो हार घालून घेतला नाही... हाताने आडवला... आणि ते एस. एम. यांना म्हणाले, 'सभागृहातील एक वर्षाची तुमची विरोधी पक्षनेतेपदाची तांत्रिक मुदत संपली असेल... पण माझ्या दृष्टीने तुम्ही माझे कायमचे नेते आहात... विरोधी पक्षात असलात तरी...' यशवंतरावांनी तोच हार एस. एम. यांच्या गळ्यात घातला... पुण्याला जाऊन त्यांचा सत्कार केला... पुढच्या वर्षीचे विरोधी पक्षनेते उद्धवराव पाटील यांचा देवगिरीच्या महाविद्यालयात भव्य कार्यक्रम घेवून यशवंतरावांनी सत्कार केला. त्यावेळचे विरोधी पक्षनेते हे असे होते.... त्यावेळचे सत्ताधारीही तेवढ्याच बौद्धिक उंचीचे होते... त्यावेळच्या सत्ताधारी बाकावर यशवंतराव चव्हाण... नंतर वसंतराव नाईक, बाळासाहेब देसाई, पी. के. सावंत...., जीवराज मेहता, राजारामबापू पाटील, मधुकरराव चौधरी, यशवंतराव मोहिते, प्रतिभाताई पाटील, असे एकसे एक फाईल समजणारे... फाईलवर पानभर आपली मते व्यक्त करणारे मंत्री होते. देशाने महाराष्ट्राचे १५ पुरोगामी कायदे स्वीकारले... तो हा महाराष्ट्र... त्या महाराष्ट्रात विरोधी बाकावर तेवढेच दिग्गज आमदार होते... १९५७ साली यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना सत्ताधारी बाकावरची सदस्य संख्या विरोधीकांपेक्षा फक्त ९ सदस्यांनी जास्त होते.... त्यावेळी 'डिफेक्शन ॲक्ट' नव्हता... १० आमदारांना सजह फोडता आले असते... पण, उद्धवराव पाटील म्हणाले की, 'आम्हाला अशा प्रकारे सत्ता मिळवायची नाही...' एवढ्या वैचारिक उंचीची माणसं तेव्हा होती... राजकारणाला उंची होती... दर्जा होता... आज विरोधी पक्षनेत्याला विधानसभा अध्यक्षांनी 'विरोधी पक्षनेत्याचा' दर्जा द्यावा, ही जयंतरावांची मागणी योग्यच आहे... खरंतर जयंतरावच एवढे अनुभवी आहेत की, सगळ्या विरा[illegible]ेधी पक्षांनी एकत्र येवून हक्काने विरोधी पक्षनेतेपद घ्यावे आणि ते जयंतरावांना मिळायला काही हरकत नाही.... ते अर्थमंत्री होते... गृहमंत्री होते... आज प्रभावी आमदार आहेत... पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे विधानसभेत दर्जा घ्यायचा असेल तर घ्या.... महाराष्ट्राचे राजकारण दर्जेदार कधी होणार? या प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्राला हवे आहे... ते कोण देणार? हाच प्रश्न आहे...

सध्या एवढेच...

**लेखक : मधुकर भावे**

**संकलन :- संतोष मोहिते**

---

## वाचकांच्या लेखणीतून

# आयुष्य

ईश्वराची एक अनमोल अशी देणगी म्हणजे आयुष्य .असे म्हणतात की आयुष्याच्या चित्रपटाला once more नसतो, ना त्याचा काही नेम असतो.

जसे जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा मृत्यू हा अटळ असतो पण तो मरण्याआधी जे सत्कृत्य करतो ना त्यावर त्याच्या आयुष्याचे पुस्तक ठरते .जरी त्या पुस्तकाचे पहिले पान जन्म आणि शेवटचे पान मृत्यू असले तरी त्यातील मधली पाने ही आपण भरत असतो . नदीच्या दोन काठाप्रमाणे आपले जीवन असते .ते कधी एकमेकांना भेटत नाहीत पण ते एक सुखमय प्रवाह नक्कीच बनवतात ;तसेच आपले जीवन देखील असते .

आयुष्याच्या रंगमंचावर नाना भूमिका बजावणारे आपण खुप साऱ्या गोष्टींमध्ये गुरफटून जातो . भूतकाळातील गोष्टी असो किंवा भविष्याची चिंता, भावकीचा वाद असो किंवा पैशांची धुंदी, राजकारण असो किंवा समाजकारण, खोट्या नात्यांचा दिखावा असो किंवा आपली मानलेली नाती, कामाचा ताण असो किंवा करिअर चा तणाव . या सगळ्या गोष्टींच्या विळख्यात एवढे अडकून जातो आणि आपला आजचा दिवस जगायचेच राहून जातो . नुसता पैसा पैसा पण काय कामाचा जर तोच पैसा एक सुखाची झोप देऊ शकत नाही .अरे जन्माला येताना सोबत काही आणत नाही आणि जाताना पण काही नेत नाही .मग हे माझे ते माझे हा भाव तरी कशाला ...

वीज ही लखलखे, मेघ हे दाटले,
अश्रू हे सांडले, शब्द हे फाटले,
धीर हा सुटला, हाथ हे थरथरले,
जमिन ही हादरली, वणवा हा पेटला ,
काळ हा थांबला , क्षण हे विखुरले ,
रंग हे सांडले , काळोख हा दाटला ,
दिवा हा विझला, श्वास हा थांबला,
जगण मातीमोल झाले , आयुष्य हे संपले
माझं माझं म्हणूनी सगळं जागेवर राहिले ...

-----------------------------------

लेखिका -
भोर वैष्णवी रमेश
मु. पो. रांजणी,
ता . आंबेगाव , जि . पुणे

---

## अनिकेत अन्नमवाड या तरूण कर्मचार्याचा कार्यालयात हृदयविकारांने मृत्यु

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------



मुखेड तालुक्यातील अंबुलगा बु. येथिल अनिकेत गंगाराम अन्नमवाड हे दुय्यम निबंधक कार्यालय पांढरकवडा जि.यवतमाळ या कार्यलयात कर्तव्यावर असताना हृदंयविकारांच्या तीव्र झटक्याने वयाच्या पस्तीसाव्या वर्षी निधन झाले. अतिशय कमी वयात मृत्यु झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्या पश्च्यात दोन लहान मुलं असून पत्नी, आई, भाऊ असा परिवार आहे.मुखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.रामोड साहेब यांचे ते जावाई होते. अंत्याविधी दिनांक ४ रोजी मुळगावी मुखेड तालुक्यातील अंबुलगा बु. येथे दुपारी १ वाजता होणार आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

## कांदा उत्पादक संघटनेच्या निवेदनाची आमदार मंजुळाताई यांनी घेतली दखल
## पावसाळी अधिवेशनात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------

विधानसभेच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात आमदार मंजुळाताई गावित यांनी कांदा उत्पादकांना हमीभाव द्यावा, साक्री तालुक्यात वीज प्रतिबंध योजना त्वरित बसवावी अशी मागणी आपल्या भाषणात केली आहे.



पावसाळी अधिवेशनात अध्यक्ष महोदयांसमोर कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न उपस्थित करताना साक्री तालुक्याच्या आमदार सौ मंजुळाताई गावित

शेतकरी सुखी तर राज्य सुखी हा शेतकऱ्यांचा हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून राज्यातील बळीराजाला धैर्य देणे त्याला बळकट करणे आणि शेतीला नैसर्गिक आपत्ती पासून वाचवण्यासाठी श्वासत उपाय योजना केल्याबद्दल मी केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे मनापासून अभिनंदन करते असे मंजुळा ताईंनी आपल्या भाषणात विचार मांडले.

आमदार मंजुळा गावित यांनी आपल्या भाषणात साक्री तालुक्याच्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला तो म्हणजे अध्यक्षांना असे सांगितले की माझ्या मतदारसंघात दि.६ ते ७ मे पासून पाऊस सुरू झाला आहे. त्यात शेतकऱ्यांची कांद्याचे फार मोठे नुकसान झाले आहे पंचनामे झाले आहेत परंतु अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. नुकसान भरपाई अनुदान तातडीने मिळावे आणि कांद्याला हमीभाव ३५०० रु. पर्यंत तरी मिळायला पाहिजे अशी विनंती अध्यक्ष महोदयांना आमदार त्यांनी केली. जसे की गुजरात राज्यात शेतकऱ्याला दोनशे रुपये अनुदान दिले त्याचप्रमाणे आपल्या महाराष्ट्र सरकारने सुद्धा शेतकऱ्यांना पाचशे रुपये अनुदान द्यावे ही विनंती आमदार ताईंनी अध्यक्ष महोदयांना केली आहे. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आमदार मंजुळा गावित पावसाळी अधिवेशनात आपले भाषण गुरुवार दि.३.६.२०२५ रोजी केले.

## ढोलबारे मार्केटच्या शेतकरी कार्यसमितीत खांदेपालट
## अध्यक्षपदी श्री सुभाष शिंदे, तर उपाध्यक्षपदी संगीता नांद्रे

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------

ढोलबारे खाजगी कसमादे शेतकरी कार्य समितीतील पदाधिकाऱ्यांच्या जबाबदारीमध्ये फेरबदल करण्यात आले असून कार्य समितीचे पहिले अध्यक्ष शैलेंद्र कापडणीस यांच्या निधनानंतर अनेक दिवसांपासून रिक्त असलेल्या अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागेल याकडे सर्वांचेच लक्ष असताना ती प्रतिक्षा अखेर संपली.

दि. ३ (गुरुवार) रोजी ढोलबारे मार्केटच्या मुख्य सभागृहात झालेल्या बैठकीत आज समितीतील सदस्याच्या खांद्यावर नव्याने महत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली. बाजार समितीचे सभापती कृषिरत्न सुरेश (नाना) पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत,






सचिव गणेश पवार, उपसचिव प्रा. अमोल बच्छाव यांच्या समक्ष झालेल्या बैठकीत सर्वानुमते शेतकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष शिंदे यांच्या गळयात अध्यक्षपदाची माळ घालण्यात आली, तर संगिता नांद्रे यांची कार्याध्यक्षपदी, भिला ठोंबरे, मयुर नेरकर, नितिन अहिरराव यांची उपाध्यक्षपदी त्याबरोबरच शेतकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते बिंदू शेठ शर्मा यांची सल्लागार पदी निवड करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या तक्रारी, अडिअडचणी सोडविण्यासाठी, आर्थिक उन्नतीसाठी, मार्केटच्या पायाभूत सुविधा, प्रशासनाचा दर्जा उत्तम राखण्यासाठी सदर कार्यसमिती कार्यरत असून शेतकऱ्यांच्या हीतासाठी सर्वोतोपरी काम करावे अशी भावना सभापती सुरेश (नाना) पवार यांनी व्यक्त केली. तसेच आगामी काळात या कार्यसमितीचा विस्तार केला जाईल असेही ते यावेळी म्हणाले.

याप्रसंगी संदीप गांगुर्डे, भास्कर बागुल, प्रविण अहिरे, नयन सोनवणे, ज्योतिराव बागूल, सुनिल वाघ, परशुराम अहिरे, चंद्रकला चौरे आदी सदस्य तसेच व्यवस्थापक किरण अहिरे, चेतना पगारे, आकाश चव्हाण यांची उपस्थिती होती.

## महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने काष्टी येथील परिक्रमा पॉलिटेक्निकला अतिउत्कृष्ट (Excellent) श्रेणी प्रदान

पल्लवी शेलार
श्रीगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------

काष्टी येथील मा. श्री. बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट संचलित परिक्रमा पॉलिटेक्निक महाविद्यालयातील सिव्हिल, इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल या विभागांना महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी अतिउत्कृष्ट (Excellent) श्रेणी प्रदान करण्यात आली त्याबरोबर कॉम्प्युटर व मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स या दोन विभागांना उत्कृष्ठ श्रेणी प्रदान करण्यात आली.

एकाचवेळी तीन विभागांना अति उत्कृष्ट (Excellent)श्रेणी मिळवणारे परिक्रमा पॉलिटेक्निक हे श्रीगोंदा तालुक्यातील पहिले महाविद्यालय ठरले. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या




सर्वेक्षण समितीने महाविद्यालयास भेट दिली व त्याअंतर्गत महाविद्यालयाचे कामकाज व सुविधांची तपासणी करून ही श्रेणी प्रदान केली.

या नेत्रदीपक यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक माजी मंत्री बबनरावजी पाचपुते, अध्यक्षा डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार श्री.विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. प्रतापसिंह पाचपुते, ॲकॅडमीक डायरेक्टर सौ. इंद्रायणी पाचपुते, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, अती.ॲकॅडमीक डायरेक्टर डॉ. संजिवन कदमपाटील, तंत्रनिकेत न प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, इंजीनिअरिंग प्रभारी प्राचार्य मोहन धगाटे, एम.बी.ए. डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, बी.फार्मसी प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ डी.फार्मसी प्राचार्य रमेश शिंदे, सायन्स कॉलेज प्राचार्य डॉ. पांडुरंग इथापे यांनी अभिनंदन केले.

परिक्रमा तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पिपरिया ग्रामपंचायतीतील 28 लाखांच्या घोटाळ्याचा उघड!
## भ्रष्टाचाराच्या विरोधात भाजपचा आक्रमक लढा – 10 जुलैपासून आमरण उपोषण

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------

आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्रातील सर्वात मोठी आणि अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागातील पिपरिया ग्रामपंचायतीत नोव्हेंबर २०२३ मध्ये तब्बल २८ लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा मोठा आरोप उफाळून आला आहे. सरपंच व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या संगनमतातून हा आर्थिक घोटाळा केल्याचे स्पष्ट झाले असून, संबंधितांवर अद्यापपर्यंत कोणताही गुन्हा दाखल न होणे ही शोकांतिका असल्याची टीका करण्यात येत आहे.

भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवणारे ग्रामपंचायतीचे उपसरपंच गुणाराम बी. मेहर यांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून, १० जुलैपासून ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण छेडण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.




सरपंच व अधिकारी दोषी, तरीही पोलिस कारवाई नाही!

या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असता, ग्रामपंचायत अधिकारी आर.यू. घरत यांना निलंबित करण्यात आले व सरपंच अनिल सोयाम यांना कलम ३९(१) अंतर्गत अपात्र ठरवण्यात आले. हा निर्णय अपर आयुक्त व ग्रामविकास मंत्रालयानेही मान्य केला. मात्र सरपंचाने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल करून तात्पुरती स्थगिती मिळवली.

मुख्य कार्यकारी अधिकारींची टाळाटाळ – भाजपचा आक्रमक इशारा

उपसरपंच मेहर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वतः तोंडी आश्वासन दिले होते की, निर्णय आल्यानंतर गुन्हा दाखल केला जाईल. मात्र सहा महिने उलटून गेले तरीही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नाही.

आता हा विषय राज्याचे मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री तसेच स्थानिक आमदारांच्या निदर्शनास आणून देण्यात आला आहे. तरीसुद्धा पुढील आठवडाभरात कारवाई न झाल्यास, पिपरिया भाजप तर्फे जोरदार आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

भाजप शक्तिकेंद्र प्रमुख गुणाराम मेहर यांची रोषपूर्ण प्रतिक्रिया :

" पिपरिया ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार सिद्ध झाला असून, सर्व पुरावे असूनही गुन्हा दाखल न होणे ही दुर्दैवाची बाब आहे. यामध्ये अनेक मोठी नावे अडकलेली आहेत. विभागीय चौकशी झाली तर अनेकांचे चेहरे उघडे पडतील. जनतेमध्ये संभ्रम व अस्वस्थता निर्माण झाली असून, आम्ही आता आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे."

या लढ्याचे पडसाद संपूर्ण तालुक्यात उमटत असून, ग्रामपंचायत पातळीवरील भ्रष्टाचाराविरुद्धचा हा लढा आता निर्णायक वळणावर येणार, यात शंका नाही.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस कहा था कोरा.. कोरा.. (७/१२) ले लिया वोट मेरा..
## कर दो पुरे वादे जो तुमने कीये ... किसान को और क्या चाहिये... श्री संजय बच्छाव

श्री प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------

गेल्या विधानसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी शेतकऱ्यां चा ७/१२ कोरा करणार असे आपल्या भाषणात शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते परंतु त्याची पूर्तता अजूनही झालेली नाही.

बळीराजा मुख्यमंत्र्यांना एक आठवण करून देऊ इच्छिता आता पावसाळी अधिवेशन



चालू आहे या अधिवेशनात तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आपला दिलेला शब्द पाळावा असे महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची भावना व्यक्त होत आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळावा अन्यथा येणाऱ्या सहकारी संस्थां च्या निवडणुकांमध्ये मध्ये त्याचे परिणाम भोगावे लागतील.

गेल्या मे महिन्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अतिवृष्टी व गारपिटीमुळे अतोनात नुकसान झाले आहे शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आणि त्यात आता कांद्याला हमीभाव नाही शेतकऱ्याचा लावणी व काढणीचा खर्च सुद्धा निघत नाही तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी कर्जमाफीची घोषणा करावी अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही व तुमची जागाही दाखवल्याशिवाय राहणार नाही. येत्या १५ ऑगस्ट च्या आत कर्जमाफी झाली नाही तर महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना तीव्र आंदोलन करेल असा इशारा महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे साक्री तालुका उपाध्यक्ष श्री संजय बच्छाव यांनी दिला.

## प्रकल्प कार्यालयाच्या जागेवर अतिक्रमण
## 'बिरसा ब्रिगेड'चा संतप्त निवेदनाद्वारे प्रशासनास इशारा

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------

गोरेगांव तालुक्यातील हिरापूर या गावातील आदिवासी विभागाच्या मालकीची प्रशासकीय जमीन खासगी व्यक्तींनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा गंभीर आरोप 'बिरसा ब्रिगेड – पूर्व विदर्भ ग्रामसभा लोकचळवळ' या संघटनेने केला आहे. या पार्श्वभूमीवर प्रकल्प अधिकारी, देवरी यांच्याकडे निवेदन सादर करून संबंधित अतिक्रमणकर्त्यांवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. हीरापुर येथील गट क्रमांक ७२९ व ७३१ मधील एकूण ५ एकर जागा प्रकल्प कार्यालयाच्या नावे असून त्या जागेवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय आश्रमशाळा सुरु करण्याचा शासनाचा प्रस्ताव होता. मात्र प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या जागेवर काटेरी कुंपणही करण्यात आले नाही, हे दुर्दैव असल्याची टीका निवेदनात करण्यात आली आहे.

सध्या भूमेश बिसेन, गुनीलाल राहंगडाले, टेबुलाल चौधरी, मनोज मेश्राम, उमेश बिसेन, खुमेन्द्र बोपचे या व्यक्तींनी त्या जमिनीवर अतिक्रमण केल्याची तक्रार 'बिरसा ब्रिगेड'कडे आली असून त्यांनी या अतिक्रमणकर्त्यांविरोधात जमीन महसूल कायद्यानुसार तातडीने कारवाई करून अतिक्रमण हटविण्याची मागणी केली आहे.

भविष्यात सामाजिक-सांस्कृतिक केंद्रासाठी प्रस्ताव

'बिरसा ब्रिगेड'ने या जागेवर ट्रायबल सब-प्लॅन अंतर्गत पुढील आर्थिक वर्षात आदिवासी समुदायासाठी सामाजिक-सांस्कृतिक भवन उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करण्याची सूचना देखील निवेदनात केली आहे.

या निवेदनावर आदिवासी नेते आणि कार्यकर्ते – विलास भोगारे (राष्ट्रीय समन्वयक व पेसा अभ्यासक बिरसा ब्रिगेड ), मुन्ना कोसमे संघटक बिरसा ब्रिगेड , लोकेश ताराम बिरसा ब्रिगेड समन्वयक, मधुर दिहारी बिरसा ब्रिगेड प्रचारक आदींच्या सह्या असून, त्यांनी या लढ्यात सर्व आदिवासी समाज एकत्र येऊन न्यायासाठी लढणार असल्याचे स्पष्ट केले आहे.निवेदनाच्या प्रतिलिप्या आदिवासी विकासमंत्री, प्रधान सचिव, आयुक्त, आणि नागपूर येथील अप्पर आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत.

## पॅन्क्रियाटिक डक्ट लिक आजाराने ग्रस्त रुग्णास राणी अवंतीबाई सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, गोंदिया येथे मिळाले दुसरे जीवन

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

बालाघाट जिल्ह्यातील लांजी तालुक्यातील बडगाव येथील लक्ष्मिचंद खरे (वय ३३) हे गेल्या दोन वर्षांपासून पॅन्क्रियाटिक डक्ट लिक या गंभीर आजाराने त्रस्त होते. या आजारामुळे त्यांचे आरोग्य पूर्णपणे ढासळले होते. सतत पोटात जळजळ, पोटात पाणी साचणे, रक्ताची उलटी होणे, वजन घटणे आणि अन्न न चालणे यामुळे त्यांचे जगणे कठीण झाले होते. अनेक रुग्णालयांचे दरवाजे ठोठावूनही समाधानकारक उपचार मिळाले नाहीत. शेवटी त्यांच्या नातेवाईकांनीही आशा सोडली होती.

अशा कठीण परिस्थितीत त्यांच्या शेजाऱ्यांच्या सांगण्यावरून त्यांनी









गोंदियातील डॉ. माहुले गैस्ट्रो ॲण्ड इनफर्टिलिटी सेंटर, राणी अवंतीबाई सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे संपर्क साधला. येथे दाखल होताच डॉ. राजू माहुले आणि त्यांच्या तज्ञ टीमने तत्काळ तपासणी करून उपचार सुरू केले.

एप्रिल २०२५ मध्ये करण्यात आलेल्या उपचारांमुळे रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली. आज लक्ष्मिचंद खरे हे पूर्णपणे ठणठणीत असून ते चालत-फिरत आहेत. डॉक्टरांच्या अचूक निदान आणि उपचारामुळे त्यांना जणू दुसरे जीवन मिळाले आहे.

लक्ष्मिचंद खरे यांनी डॉ. राजू माहुले आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले. उपचारानंतर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# उपवासाला भगर खाताना काळजी घेण्याचे आवाहन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------




उपवासाला मोठ्या प्रमाणात भगरीचे सेवन केले जाते. भगर खाल्ल्यामुळे अन्न विषबाधा झाल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात व नांदेड जिल्ह्यात यापूर्वी घडल्या आहेत. भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्परजिलस प्रजातीच्या बूरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्यामुळे फ्युमिगाक्लेविन यासारखी विषद्रव्ये तयार होतात. पावसाळयातील वातावरण बूरशीच्य वाढीसाठी अनूकुल असते, अशी बूरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी उपवासाला भगर खाताना काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

भगर खाताना काय काळजी घ्यावी

बाजारातून भगर आणल्यानंतर ती निवडून स्वच्छ करा. शक्यतोवर पाकीटबंद भगर घ्या. ब्रँड नाव नसलेली किंवा लेबल नसलेली भगर पाकीटे व सूटी भगर घेऊ नका. भगर घेतांना पाकीटावरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासा. भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठिकाणी, व्यवस्थित झाकण बंद डब्यात ठेवा, जेणेकरून वातावरणातील ओलाव्यामुळे बूरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस भगर साठवू नका. जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका. शक्यतोवर भगरीचे पीठ विकत आणू नका. भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता अधिक असते. त्यामूळे पिठाला बूरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी. भगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा. भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनयुक्त पदार्थ आहेत. दोन ते तिन दिवस सलग उपवास असताना या पदार्थांचे सेवन ॲसिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थांचे सेवन पचनशक्ती नुसार मर्यादितच करावे.

भगरीचे सेवन करतांना या गोष्टी लक्षात ठेवा. म्हणजे संभाव्य अपाय टाळता येईल.

भगर विक्रेत्यांसाठी सूचना

विक्रेत्यांनी पॅकबंद भगरचीच विक्री करावी. भगर खरेदी करतांना घाऊक विक्रेत्याकडून पावती घ्यावी.

भगरीचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता,परवाना क्र., पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करून घ्या.

मुदतबाह्य भगर किंवा भगर पिठाची विक्री करु नये. सुटी भगर व खुले भगर पीठ शक्यतो विक्रीसाठी ठेऊ नये.

अन्न व औषध प्रशासनाचेवतीने भगर विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्यात येत आहे. नियमाचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल येईल असे निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविली आहे.

# निघोजच्या यशश्री आहेरची राज्यात प्रज्ञाशोध परीक्षेत सातवी रँक

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निघोज येथील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी कु. यशश्री बाळासाहेब आहेर हिने मंथन फाउंडेशनतर्फे आयोजित राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत ३०० पैकी २८८ गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक, तर जिल्हा गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक पटकावला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल मंथन फाउंडेशनतर्फे पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे आणि शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे यांच्या हस्ते यशश्रीचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हिंद सेवा मंडळ, अहिल्यानगरचे अध्यक्ष शिरीष मोडक यांनी भूषवले. यावेळी विस्तार अधिकारी जयश्रीताई कारले (राहुरी), गटशिक्षणाधिकारी गायत्री कोलते (प. स. नगर) यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यशश्रीच्या घवघवीत यशामागे तिच्या वर्गशिक्षिका विद्या सालके मॅडम, तसेच काळोखे सर, मगर सर, काळे सर, दिघे मॅडम, माजी मुख्याध्यापक शिंदे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. निघोजची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही गुणवत्तेची परंपरा जपणारी शाळा असून अनेक गोरगरीब पार्श्वभूमीतून आलेली मुले येथे दर्जेदार शिक्षण घेत आहेत. सक्षम शिक्षक वर्गामुळे ही मुले परीक्षांमध्ये उत्तुंग यश मिळवत आहेत.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी केसरकर साहेब, विस्तार अधिकारी पिंपळकर साहेब, केंद्रप्रमुख बाचकर साहेब, निघोज गावच्या सरपंच चित्राताई सचिन वराळ, तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रोहन उनवणे यांनी यशश्री आणि तिच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# हिमायतनगर येथे दोन किराणा दुकानामधून केला गुटखा जप्त; अन्न व औषध प्रशासनाची कार्यवाही

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत




सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन कार्यालय, नांदेड येथील पथकाने हिमायतनगर येथे अचानक भेट देऊन शहरातील मे. प्रणव किराणा स्टोअर्स व मे.सलीम किराणा स्टोअर्स या किराणा दुकानांची तपासणी केली. तपासणी वेळी मे. प्रणव किराणा स्टोअर्स, दीक्षाभूमी चौक, हिमायत नगर या पेढीतून दीपक हरिश्चंद्र अमृतसागर वय वर्ष २८ रा. कालिका नगर हिमायत नगर या व्यक्तीच्या ताब्यातून राजनिवास सुगंधीत पानमसाला, विमल पानमसाला, डायरेक्टर स्पेशल पानमसाला, मुसाफीर पानमसाला, सागर पानमसाला, गुटखा, विविध प्रकारचे सुंगधीत तंबाखू इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा एकूण २७ हजार ६८८ रुपये प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला. संबंधित हजर व्यक्ती दीपक हरिश्चंद्र अमृतसागर वय वर्ष २८ रा. कालिका नगर, हिमायतनगर यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा अधिकारी ऋषिकेश मरेवार यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६चे कलम २६, २७, ३०(२)(अ), ५९ भारतीय न्यायसंहितेच्या १२३, २२३, २७४, २७५ कलमानुसार पोलीस स्टेशन, हिमायत नगर येथे फिर्याद दाखल केली आहे.

तसेच मे.सलीम किराणा स्टोअर्स, खुबा चौक, हिमायतनगर या पेढी तपासणी वेळी राजनिवास सुगंधीत पानमसाला, विमल पानमसाला, सागर पानमसाला, गुटखा, विविध प्रकारचे सुंगधीत तंबाखू इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा एकूण १ हजार ९५० रुपये एवढ्या किंमतीचा साठा आढळला. या पेढीतील हजर व्यक्ती अब्दुल अहमद लाल मोहम्मद वय वर्ष ४७ रा. सुभाष चौक, हिमायतनगर व पेढी मालक अब्दुल जब्बार अब्दुल मजीद खुबा चौक, हिमायतनगर यांच्या विरुद्ध अन्न सुरक्षा अधिकारी, अनिकेत भिसे यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६चे कलम २६, २७, ३०(२)(अ), ५९ भारतीय न्यायसंहितेच्या १२३, २२३, २७४, २७५ कलमानुसार पोलीस स्टेशन, हिमायतनगर येथे फिर्याद दाखल केली आहे.

तपासणी नंतर सदर दोन्ही पेढी सील करण्यात आल्या. सदरची कार्यवाही सहायक आयुक्त राम भरकड व सहायक आयुक्त संजय चट्टे यांचे मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी सर्वश्री ऋषिकेश मरेवार, अनिकेत भिसे, अरूण तम्मडवार तसेच प्रशिक्षणार्थी अन्न सुरक्षा अधिकारी अविनाश गिरी, श्रीमती शिल्पा श्रीरामे, श्रीमती अमृता दुधाटे, नमुना सहायक बालाजी सोनटक्के व पोलीस निरीक्षक अमोल भगत व इतर पोलीस कर्मचारी यांच्या सहकार्याने पार पडली.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

## विचारपुष्प

जगाच्या पाठीवर खूप श्रीमंत लोक आहेत. काही लोकांची श्रीमंती इतकी आहे ते रांत्रदिवस पैसा पैसाच करत बसतात. प्रत्येक ठीकाणी ते पैशाच्या तराजूत इतरांशी व्यवहार करतात. त्यांना त्यांची किंमत कळाली नाही आणि जेव्हा किंमत कळाली तेव्हा हताश नजरेने मागे वळून बघितले तर जीवनामध्ये फक्त पैसा कमावण्यातच हयात घालवली ! पैसा कमवला, पणं चार प्रेमाची माणंस कुठे आहेत ? पैसा ही श्रीमंती अशी आहे स्मशानातल्या लाकडा प्रमाणे तिची किंमत आहे. संसारासाठी पैसा तर कमवलाच पाहिजे. पणं समाज श्रीमंती सुद्धा आपल्याबरोबर असली पाहिजे. आपल्या कळत नकळत कोणीतरी सहज म्हटलं पाहिजे की माझ्या अडचणीच्या वेळेला पाठीमागे राहिलेली हीच ती व्यक्ती ! आणि जेव्हा दुःखी व्यक्ति त्यावेळच्या घडलेल्या कथेचं वर्णन करते, इतका मोठा बाका प्रसंग होता पणं साहेबांनी चुटकीसरशी सोडून दिला. एक नया पैशाची अपेक्षा केली नाही. तेव्हा समजावं आयुष्यात मी माणूसकीची श्रीमंती कमावली. संसारात राहून थोडाबहू परमार्थ विवेक विचाराने केला पाहिजे. पैसा हे साधन आहे साध्य नाही. जीवन सफल साध्य करण्यासाठी दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण केले पाहिजे. कधीतरी गोरगरीब आर्तपिडीत यांचे अश्रृ पुसले पाहिजे. तेव्हा कुठे समाज गावकी भावकीत चारचौघात बसल्यावर आपल्या बद्दल कौतुकाचा सोहळा मांडतात तीच आपल्या आयुष्याची दिवाळी समजावी

-------------------------

**अरविंद सोनवणे सटाणा**

# शेतकऱ्यांना विनाशर्त पिक कर्ज मंजूर करा; अन्यथा तीव्र आंदोलन- भागवत पाटील सोमूरकर

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------



सध्याच्या कठीण आर्थिक व नैसर्गिक परिस्थितीत शेतकरी अडचणीत सापडला आहे. हमीभावाचा अभाव, विमा भरपाईतील विलंब आणि नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा नाही. अशा काळात पिक कर्ज हीच शेतकऱ्यांची गरज असूनही, शेकडो शेतकऱ्यांचे अर्ज महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रलंबित ठेवण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने बँकांना जाब विचारण्यासाठी 'बँकांची शाळा' हा आंदोलनात्मक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हणेगाव येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत देखील शेतकऱ्यांचे पीक कर्ज अर्ज मंजूर न झाल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.

शिवसेनेचे भागवत पाटील सोमूरकर यांनी बँक व्यवस्थापकांना निवेदन देऊन मागणी केली की, शेतकऱ्यांचे पिक कर्ज त्वरित व विनाशर्त मंजूर करण्यात यावे. अर्ज मुख्य शाखेकडे पाठवणे, सिबिल स्कोअर अथवा अन्य तांत्रिक कारणे सांगून कर्ज नाकारले जाणे, हे अन्यायकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.

"शासनाचे निर्देश असूनही बँका पिक कर्जास विलंब करतात, हे आम्ही सहन करणार नाही. जर शेतकऱ्यांना त्रास देण्यात आला, तर युवासेनेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# आषाढी एकादशीनिमित्त प्रचिती इंटरनॅशनल स्कूल मध्ये विठ्ठल-रुख्मिणी पालखी सोहळा

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



आषाढी एकादशीनिमित्त प्रचिती इंटरनॅशनल स्कूल, साक्री यांच्या वतीने शेणपूर गावात भव्य अशी विठ्ठल-रुख्मिणी पालखी रॅली काढण्यात आली. या सोहळ्यात शाळेतील चिमुकल्या बालगोपाळांनी पारंपरिक वेशभूषा आणि मृदूम सजावटीने मन मोहवून टाकले.

पालखी रॅलीमध्ये विठू-रुख्माईची सडावलेली झाक, टाळ-मृदुंगाच्या गजरात चालणारे वारकरी, आकर्षक फलक व पारंपरिक पोशाखातील विद्यार्थी हे सर्व वातावरण भक्तिमय करत होते. संपूर्ण गावातून ही पालखी मिरवणूक पारंपरिक मार्गावरून काढण्यात आली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शेणपूर ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्य यांनी विशेष सहकार्य केले. तसेच प्रचिती इंटरनॅशनल स्कूलचे रोजच्या शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन जाणारे बस चालक यांनीही रॅलीमध्ये सक्रिय सहभाग घेत रॅलीच्या व्यवस्थापनात मोलाचे योगदान दिले.

या कार्यक्रमाला प्रचिती इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक श्री. प्रशांत पाटील प्रचिती इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन, प्रचिती पब्लिक स्कूल पिंपळनेरचे पदाधिकारी, मुख्याध्यापिका सौ. वैशाली लाडे, शाळेतील सर्व शिक्षकवर्ग तसेच तुषार देवरे व वैभव सोनवणे यांची उपस्थिती लाभली. शेणपूर गावातील व मंलाजन भजनी मंडळींचा सहभाग या रॅलीची शोभा अधिक वाढवणारा ठरला.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिकतेबरोबरच सांस्कृतिक मूल्यांची रुजवणूक व्हावी, हा school's मुख्य उद्देश होता. गावकऱ्यांनीही या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

# जुन्या सिमेंट रोडचा वेस्टेज मटेरियल गेल्या दीड ते दोन वर्षांपासून बनलेल्या सिमेंट रोडच्या बाजूला प्लाटवर टाकला?

## साप विंचवांचा कहर आदर्श कॉलोनीतील नागरिक संतप्त?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------



रिंग रोडवरील जिल्हा क्रीडा संकुलामागे, मराठा समाज भवनसमोरील आदर्श कॉलोनी सध्या अक्षरशः संकटात आहे! दीड वर्षांपूर्वी सिमेंट रस्त्याचं काम करताना जुन्या रस्त्याचा मलबा कॉलनीतील प्लॉटांमध्ये फेकण्यात आला आणि आजतागायत तो तसाच पडून आहे. या बेफिकिरीने आजूबाजूचा परिसर साप, विंचू, नेवळ यांसारख्या धोकादायक जंतूंनी व्यापलेला आहे – आणि यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

आश्वासन देऊन फिरवलं फसवणुकीचं चक्र!

काम करताना संबंधित अभियंता आणि ठेकेदार यांनी ठाम सांगितलं होतं –जुन्या सिमेंट रोडचा "वेस्टेज मटेरियल लवकरच हटवू!" पण आश्वासनावर दीड वर्ष उलटलं, जुन्या सिमेंट रोडचा वेस्टेज टाकाऊ मटेरियल तसाच आहे. परिणामी, संपूर्ण कॉलनीत धोक्याचं सावट पसरलं आहे.

शाळेच्या विद्यार्थ्यांना धोका!

मरार समाज भवनाशेजारीच बी.बी. पब्लिक शाळा आहे जिथे लहान मुलांचा रोजचा वावर असतो. त्यांच्या पालकांचं स्पष्ट म्हणणं आहे – " असा जंतूग्रस्त परिसर शाळेसमोर नको!" कुठल्याही क्षणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही!

समोर नागरिकांनी सांगितले की एक ते दोन दिवसात साप,बिचू,व इतर विषारी जीव जंतू दिसतात व ते सिमेंट रोडचा वेस्टेज टाकाऊ मटेरियल मध्ये जाऊन लपतात असे कॉलोनीतील नागरिकांनी सांगितले

प्रशासन गप्प – नागरी समस्या धुडकावून!

नागरिकांनी लेखी व तोंडी तक्रारी देऊन थकलंय, पण नगर परिषद झोपेत आहे! नगरसेवक नाहीत, प्रशासन निष्क्रिय, त्यामुळे नागरिकांचा संयम सुटू लागलाय.

लवकर निर्णय नाही – तर रस्त्यावर उतरणार!

आदर्श कॉलोनीतील संतप्त नागरिकांनी थेट इशारा दिला आहे – "जर लगेच जुन्या सिमेंट रोडचा वेस्टेज मटेरियल हटवला नाही, तर आम्ही आंदोलन करू!"

आता हा प्रश्न फक्त अस्वच्छतेचा नाही – हा जिवित सुरक्षेचा प्रश्न आहे!

जबाबदार कोण?

यासाठी थेट जबाबदार कोण? नगर परिषद? ठेकेदार? अभियंता?

कोणीही पळू शकत नाही – उत्तर द्यावंच लागेल!

आवाज उठवणारे नागरिक:

सुनील कुंभलवार, राजा यादव, सवियानंद शामकुंवर, तेजेश्वर पटले, अशोक भालाधरे, सचिन सिंग बैंस, मुकेश ताडेकर, लिलेश्वर बहेकार, रमेश शिवनकर, डॉ. बिसेन आणि इतर संतप्त नागरिक.

प्रशासनाला स्पष्ट इशारा – आता पुरे झालं!

कारवाई झालीच पाहिजे – अन्यथा रस्त्यावरच उत्तर मिळेल!

# आषाढी एकादशी; भगवान विठ्ठल ब्रम्हांडाचे पालनहार

पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे.त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत.परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या (विठ्ठलाच्या) रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या हृदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक, वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे.त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची, तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात.एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन



घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन एकादशी देवता उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय.या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८४ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे.

दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे.आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले.याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड, बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी, सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल.त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा समद ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!

---

लेखक

रमेश कृष्णराव लांजेवार
माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर

## विचारधारा

# OUT LET :- मानवी मनाला शांत आणि मोकळे करणारा उपाय

लाखो जीव घेणार्या क्रूर हिटलरने शेवटी आत्महत्या केली !

सुंदर विचार देणारे साने गुरुजी आत्मघात करुन घेतात.

मनशक्ती नावाचं मनाला खंबीर करण्याचं शिक्षण देणारे लोणावळ्याचे स्वामी विज्ञानानंद मंत्रालयावरुन उडी मारुन जीव देतात.

आध्यात्मिक गुरु अशी ओळख निर्माण केलेले व कित्येकांना आधार देणारे भैय्युजी महाराज आपलं जीवन आपल्या हातानं संपवतात.

पॉझिटिव्ह विचार देणारा चित्रपट करुनही सुशांत सिंग राजपुतनं* नैराश्यातून आत्महत्या केली.

आणि आता सहा आठ महिन्यांपूर्वी नैराश्याशी लढा कसा द्यायचा हे शिकवणाऱ्या शीतल (आमटे) करजगी आपलं जीवन संपवतात.

आजची नागपूरची बातमी उच्च विद्याविभूषित, दिवंगत कुलगुरूंच्या पत्नी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ज्योत्स्ना मेश्राम* यांनी नवव्या माळ्यावरून उडी घेऊन नैराश्यातून आत्महत्या केली.

**या काही सेलिब्रिटींच्या उदाहरणातुन काय शिकायचं आपण?**

पाण्यात शांतपणे पोहोणारं बदक वरुन शांत दिसत असलं तरी पाण्याखाली त्याचे पाय वेगानं हलत असतात. शांत पोहोतोय हे दाखवण्यासाठी करावे लागणारे त्याचे कष्ट फक्त त्यालाच माहित असतात. माणूस वर वर दिसतो तितका आतून खंबीर असेलच असं नाही. त्याच्या मनात वेगळी खळबळ असु शकते, जी आपल्यापर्यंत पोहोचत नसते किंवा तो त्या आनंदी आणि सुखी चेहर्याच्या आड आपली खळबळ लपवत असतो, लपवण्याचा प्रयत्न करत असतो.

शेवटी काय...?? वर सुंदर दिसणारा ताजमहाल असला तरी खाली कबरच आहे हे विसरुन चालणार नाही.

भैय्यूजी महाराजांनी आत्महत्या केल्या नंतर ABP माझा चॅनलने एक परिचर्चा घडवून आणली होती.

त्यात बोलताना भैय्यूजी महाराजांचे मित्र - श्री. अशोक वानखेडे यांनी मानवी स्वभावाचा फार चांगला पैलू सांगितला. भैय्यूजी महाराज स्वतः एक अध्यात्मीक गूरू होते परंतू ते एक व्यक्ती पण होते. आपल्या मनातील स्ट्रेस बाहेर काढायला त्याच्या जवळ outlet नव्हता. डॉ. शितल आमटे (बाबा आमटे यांची नात - त्याचं ही अगदी भैय्यू महाराजासारखंच झाले.)

**इतकं महत्वाचं असतं का हे outlet ? होय .**

कोट्यावधी रूपये खर्च करून पाण्यासाठी विशाल धरण बांधलं आणि समजा त्याला outlet च दिले नाही तर काय होईल? निश्चितच धरण फुटेल. इतकं महत्वाचं असते हे waste weir मानवी शरीर म्हणजे विविध पंचतत्वापासून सांधलेलं एक धरणच आहे. या शरीरात समस्यांची आवक अति प्रमाणात झाली तर हे शरीररूपी धरण फुटेल की राहील ?

**मुंबई का तुंबते?**

**पुरेसे outlets राहिले नाहीत म्हणून**

म्हणून आपलं outlet सदैव सताड उघडं ठेवा. आपल्या तोंडाचे outlet वापरून आपल्या समस्या आपल्या माणसांना सांगा. आपल्या अंर्तमनाचं outlet open करण्यासाठी Meditation व योगाचा अवलंब करा आणि शक्य झाल्यास जगातील सगळ्यात मोठं outlet म्हणजे आपले डोळे, ते उघडा. फुटून जाऊ द्या अश्रूंचा बांध...वाहून जाऊ द्या.. स्ट्रेस, दुःख, उपेक्षा.. पिस्तुलाच्या गोळीने डोक्याला छिद्र पाडण्यापेक्षा, पंख्याला लटकण्यापेक्षा.. हे केव्हाही सोपं नाही का?

म्हणूनच मित्र नावाच्या खांद्याचा आधार घ्या. मन मोकळं करा. बेस्ट आउटलेट परिवार आणि मित्र!

हसा! बोला! रडा! भांडा!

व्यक्त व्हा!! मुक्त व्हा..!!

काळजी घ्या....

सोडून गेल्यावर MISS YOU म्हणण्यापेक्षा सोबत आहे तोपर्यंत WITH YOU म्हणा. आपुलकीची माणसं मिळायला खुप मोठं भाग्य लागतं.

---

संकलन

संतोष मोहिते

# मनुष्यचलित टोकण पेरणी यंत्राचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा : कृषी विभाग

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---

शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमता वाढविणे, कामाचा वेळ व कष्ट कमी करणे हे उद्दिष्ट ठेवून कृषी विभागामार्फत कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्यात येत आहे. कृषि यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत मनुष्यचलित टोकण पेरणी यंत्राचा लाभ घ्यावा. हे पेरणी यंत्रावर अनुदान उपलब्ध असून शेतकऱ्यांनी या टोकण यंत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

कृषि यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत मनुष्यचलित टोकण पेरणी यंत्र (Dibbler) गादी वाफयावर/ बेडवर पेरणी करता येत आहे. सरीमध्ये साचलेले पाणी पीकाला उपलब्ध होत आहे. दिर्घकाळ पावसाचा खंड पडल्यास पिकाला पाण्याचा ताण बसत नाही. अतिरीक्त किंवा जास्तीचे साचलेले पाणी सरीमधून निघुन जाते. या मनुष्य चलीत पेरणी यंत्राचा वापर करुन एक मजुर एका दिवसात 3 ते 4 एकर सहजरीत्या गादी वाफयावर, बेडवर पेरणी करु शकतो.

अर्ज करण्याची पद्धत शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या पोर्टलवर (सीएससी) सेतु सुविधा केंद्रात जाऊन ऑनलाईन अर्ज सादर करावा. जो शेतकरी प्रथम अर्ज करेल त्यांची प्रथम निवड होणार आहे. (FCFS) यासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे.

यंत्राचे फायदे

पेरणीसाठी कमी मनुष्यबळाची आवश्यकता. वेळ आणि बियाण्यांची बचत. एकसंध पेरणीस मदत. उत्पादनक्षमता वाढविण्यात मदत. या योजनेचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी शेती सुलभ आणि उत्पादनक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अधिक माहितीसाठी संपर्क तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाला भेट द्यावी, असेही आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७